नगरपरिषद प्रशासन संचालनालय
७वा मजला, बेलापूर भवन, नवी मुंबई महानगरपालिका इमारत,
सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४

नपप्रसं २०२५/ वैशिष्ट्यपूर्ण विशेष अनुदान /प्र.क्र./कक्ष-७/ ४९१ दिनांक- - 5 FEB 2025

**वाचा** :-

१) नगर विकास,शासन निर्णय क्रमांक:-धोरण -२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि.१७ नोव्हेंबर, २०१७ व दि. ३० सप्टेंबर ,२०२०.
२) नगर विकास विभाग शासन निर्णय, क्रमांक:-स्वमअ २०२३/ प्र.क्र.CN६४६७७५(१) /नवि-३४, दिनांक १० डिसेंबर, २०२४.
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०२४/प्र.क्र.३४/अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०२४.
४) नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२५५/नवि-१६(ई-८३३०१०) दि.६ जानेवारी ,२०२५.
५) राज्य अभियान संचालक स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी )यांचे पत्र क्र./रा.अ.स/स्वमअ/२०२४-२५/३९ दिनांक :-१३/०१/२०२५.

**सन २०२४-२०२५ साठी " वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान" योजनेअंतर्गत "संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" यांना निधी वितरीत करण्याबाबत. लेखाशीर्ष (४२१७ ०६०३) रक्कम रु. १,०४,७०,०००/- (एक कोटी चार लाख सत्तर हजार फक्त) निधी वितरण आदेश क्र.१.**

नगर विकास, शासन निर्णय संदर्भ क्र-१ ते ३ अन्वये २०२४-२०२५ या वित्तीय वर्षासाठी वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत (४२१७ ०६०३ ) " अंतर्गत सन २०२४-२०२५ करिता स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) २.०अंतर्गत २११ मैला उपसा वाहने (Desluding Vehicles) खरेदीच्या अनुषंगाने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरणा करण्यासाठी रक्कम रु.१०,४७,००,०००/-(रुपये दहा कोटी सत्तेचाळीस लाख फक्त) निधी मंजूर करण्यात आलेला आहे सदर निधी पैकी संदर्भ क्र.४ अन्वये प्रथम टप्यात १,०४,७०,०००/-(एक कोटी चार लाख सत्तर हजार रुपये फक्त) निधी वितरणासाठी शासन निर्णय प्राप्त झाला आहे. सदर निधीच्या विनियोगाबाबत मुदत ही ३१ मार्च २०२६ पर्यंत आहे.

सदर विषयान्वये वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत (४२१७ ०६०३ ) अंतर्गत उपरोक्त वाचा मधील शासन निर्णय क्र.४ अन्वये १,०४,७०,०००/- (एक कोटी चार लाख सत्तर हजार फक्त) निधी मंजूर करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने वाचा मधील संदर्भ क्र.५ अन्वये निधी वितरीत

करण्यासाठी " राज्य अभियान संचालक" , स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) यांचे पत्र प्राप्त झाले आहे.त्यानुषंगाने सोबत नमूद करण्यात आलेल्या विवरण पत्रातील परिशिष्ट "अ"मध्ये नमूद करण्यात आलेल्या "राज्य अभियान संचालक" , स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ), यांना नगरविकास विभाग नवि-१६ कडील शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्याचे आदेशीत केलेनुसार संबंधितांनी कळविलेल्या त्यांच्या बँक खातेवर निधी वितरीत करण्यात येत आहे.

| परिशिष्ट -अ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| आदेश क्र.१ | | | | | | |
| सन २०२४-२५ आर्थिक वर्षाकरिता नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजना लेखाशीर्ष (४२१७०६०३) अंतर्गत निधी वितरण. | | | | | | |
| **अ.क्र .** | **निधी वर्ग करण्यात येणारे कार्यालय व खात्याचे नाव** | **आदेश क्रमांक व दिनांक** | **IFSC Code** | **खाते क्र.** | **रक्कम रु.(अंकात )** | **रक्कम रु.(अक्षरात)** |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | "संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" (Swachh Maharashtra Mission Directorate) | शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण -२०२४/प्र.क्र.२५५ /नवि-१६(ई-८३३०१०) दिनांक :- ०६ जानेवारी, २०२५ | IDIB000N052 | 6366021283 | 1,04,70,000/- | एक कोटी चार लाख सत्तर हजार फक्त |
| **एकूण रक्कम रु.** | | | | | 1,04,70,000/- | **एक कोटी चार लाख सत्तर हजार फक्त** |

शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील विहित केलेल्या कार्यपद्धती, सर्व अटी व शर्ती लागू राहतील. त्यांचे काटेकोरपणे पालन करून "राज्य अभियान संचालक" , स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा. तसेच, तसेच वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संबधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्यात यावे व सदर उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत संचालानालायास सादर करण्यात यावी.

सदर निधी खात्यात जमा झाल्यानंतर, ७ दिवसात निधी प्राप्त झाल्याची पोहोच संचालनालयास सादर करावी. आपली पोहोच प्राप्त न झाल्यास संचालनालय आदेशान्वये आपले कार्यालयास निधी प्राप्त झाला आहे असे ग्राह्य धरण्यात येईल.

मा. आयुक्त तथा संचालक, न.प.प्र.सं. यांच्या मान्यतेने.

(संजय काकडे)
सह आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई

प्रत-

१. प्रधान सचिव, नगरविकास विभाग -१६, मंत्रालय, मुंबई -३२.
२. "राज्य अभियान संचालक",स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी),४ था मजला ,ए.पी.जे.हाउस,मुंबई ४०००२०.